20 OCT 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांमुळे पोहोचला युवा महोत्सव देशभर

## कुलगुरू डॉ. शिर्के; आटपाडीत ४२ व्या युवा महोत्सवाची सांगता

**सकाळ वृत्तसेवा**

आटपाडी, ता. १९ : विद्यार्थ्यांच्या कला-गुणांमुळे शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव देशभर पोहोचला. महोत्सव संस्कृती जतन करण्याचे काम करीत आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात युवा महोत्सव झाला. पारितोषिक वितरण सोहळ्यात डॉ. शिर्के बोलत होते. आटपाडी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, डॉ. सुभाष करांडे, एच. यू. पवार, शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य विजय लोंढे, डॉ. दत्तात्रय जाधव, प्राचार्या डॉ. योजना जुगळे, प्राचार्य डॉ. विजया चव्हाण, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, नीलेश ढामसे उपस्थित होते. डॉ. शिर्के यांनी युवा महोत्सवाच्या नेटक्या संयोजनाचे कौतुक केले.



**आटपाडी : येथे श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाची सांगता झाली. विजेत्यांसह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अमरसिंह देशमुख, प्राचार्य, विद्यार्थी.**

ते म्हणाले, ''विद्यापीठाच्या कार्यशाळांतून कलाकाराचा दर्जा व गुणवत्ता वाढवण्यासाठी उपयोग झाला. यंदाच्या महोत्सवात ४० टक्क्यांनी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला. अजूनही अनेक महाविद्यालये युवा महोत्सवात सहभाग घेत नाहीत. करिअरसाठी शंभर वाटा शोधाव्या लागतात. कला यश देतेच.'' अमरसिंह देशमुख म्हणाले, ''ग्रामीण भागातील महाविद्यालयात मध्यवर्ती कला महोत्सव संयोजनाची दिलेली जबाबदारी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांतील जोष व उत्साह स्फूर्ती देणारा आहे.''

डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, ''युवा महोत्सवात काही बदल केलेत. सहभागींची संख्या वाढली. गतवर्षी १४७१ विद्यार्थ्यांनी, यंदा २६३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.''

20 OCT 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात कोल्हापूरच्या महाविद्यालयांचे वर्चस्व

## आटपाडीत तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती महोत्सवाचे यशस्वी आयोजन : इचलकरंजी, गडहिंग्लज, आजरासह करवीरच्या कॉलेजची मोठी बाजी

प्रतिनिधी
आटपाडी

शिवाजी विद्यापीठाचा तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती युवा महोत्सव यशस्वी करत आटपाडीतील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाने शिवधनुष्य यशस्वी पेलले आहे. या महोत्सवात विविध स्पर्धांतून कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी वर्चस्व गाजवले.

दरम्यान, पारितोषिक समारंभावेळी युवा महोत्सव म्हणजे फक्त कलागुणांना वाव नसून तो संस्कृती जतन करण्याचा भाग असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाने संयोजनाची ही संधी दिल्याने कृतार्थ असल्याची भावना आटपाडी एज्युकेशनचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी युवा महोत्सवातुन विद्यार्थ्यांचे भवितव्य घडत आहे. प्राचार्य डॉ. विजय लोंढे यांनी महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच घटकांनी योगदान दिल्याचे सांगितले.



आटपाडी : युवा महोत्सवातील विजेत्यांच्या गौरवप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अमरसिंह देशमुख व मान्यवर.

**मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धांचा निकाल**

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी पटकाविला. लोकनृत्य फिरता चषक आजरा महाविद्यालयने पटकाविला.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त गौरव चषकात लोकनृत्यात आजरा महाविद्यालय आजरा, तर शास्त्रीय नृत्यात विवेकानंद कॉलेज कोल्हापुर यांनी फिरता चषक पटकाविला. कोल्हापुरच्या विवेकानंद कॉलेजने नाट्य विभागातील सर्वच चषकावर नाव कोरले. संगित विभागातही विवेकानंद कॉलेजने वर्चस्व कायम ठेवले. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी यांनी स्थळ चित्रण, व्यंगचित्रण, कातरकाम, भितीचित्र, स्थळ छायाचित्रण, मातीकाम, रांगोळी, सांघीक रचनाकृती, मेहंदी रचना विभागात वर्चस्व कायम ठेवले.

**कोल्हापूरचे विविध प्रकारात यश**

शास्त्रीय नृत्य–प्रथम–देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – डी. डी. शिंदे सरकार कॉलेज नकला – व्दितीय – राजाराम कॉलेज एकपात्री अभिनय – तृतीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स उत्तेजनार्थ – राजाराम कॉलेज व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सुगम गायन – अनुक्रमे शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल गायन – अनुक्रमे देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग शास्त्रीय सुरवाद्य – व्दितीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल वादन व्दितीय – विवेकानंद कॉलेज स्थळचित्रण – प्रथम – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्दितीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज.

व्यंगचित्र – अनुक्रमे – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेज उत्तेजनार्थ – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

भितीचित्र – उत्तेजनार्थ – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी.

कातरकाम – प्रथम – शिवराज कॉलेज ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, तृतीय – न्यू कॉलेज.

स्थळ छायाचित्रण – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय–आजरा महाविद्यालय, उत्तेजनार्थ – शिवाजी विद्यापीठ.

मातीकाम – प्रथम – राजाराम कॉलेज, व्दितीय – दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

रांगोळी – प्रथम – यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, व्दितीय – कला प्रबोधनीचे इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन, तृतीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस गडहिंग्लज.

मेहंदी– तृतीय – डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

वक्तृत्व – मराठी – प्रथम – भोगावती महाविद्यालय, हिंदीत – व्दितीय – न्यु कॉलेज इंग्रजी – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय – शिवाजी विद्यापीठ.

### विवेकानंद कॉलेजला दुहेरी चॅम्पियनशीप

विवेकानंद कॉलेजने शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरू स्व. डॉ.आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप व अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिपावर नाव कोरले.

पुण्यनगरी

# डी. आर. माने महाविद्यालयास विद्याशाखेचा प्रथम पुरस्कार

**कागल :** शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेचा लाभ डी. आर. माने महाविद्यालयाने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळवून दिला. याबद्दल विद्यापीठाच्या मानव्य विज्ञान विद्याशाखेच्या निमशहरी या विभागाचा सन २०२१-२२ चा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार डी. आर. माने महाविद्यालयाला देण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले यांचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले, भैया माने, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने. प्रा. श्रीनिवास पाटील, प्रा. सचिन कांबळे, बाबूराव पुंडे उपस्थित होते.

20 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाँडिचेरी विद्यापीठात स्तुती कार्यशाळेला सुरुवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे आज पाँडिचेरी विद्यापीठात स्तुती कार्यशाळेला प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाचाही यात सहभाग आहे. राज्यपाल लेफ्टनंट डॉ. तमिलीसाई सौंदराराजन यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. स्तुतीचे समन्वयक प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

डॉ.तमिलीसाई सौंदराराजन म्हणाल्या, की संशोधन क्षेत्रात प्रगती करण्यासाठी स्तुती सारख्या योजना महत्त्वाच्या आहेत. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा योजनांचा लाभ घेतला पाहीजे.' पाँडीचेरी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गुरमीत सिंग, सीआयएफ सेंटरचे सध्याचे प्रमुख प्रा. शिवशंकर, माजी प्रमुख प्रा. बाला मणिमरन यांच्यासह देशभरातील विद्यापीठातून प्राध्यापक उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. श्रीमती तामिलीसई सौंदराजन यांनी दीपप्रज्वलनाने बुधवारी स्तुती कार्यशाळेचे उद्घाटन केले. शेजारी प्रा. शिवशंकर, प्रा. गुरमीत सिंग, प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. बाला मणिमरन.

20 OCT 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विभागीय मुलींच्या खो-खो स्पर्धेत विवेकानंद कॉलेजला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर विभागीय मुलींच्या खो-खो स्पर्धा जयहिंद मंडळाच्या मैदानावर झाल्या. त्यामध्ये कोल्हापूर विवेकानंद कॉलेजने विजेतेपद, तर गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकाविले. बारा महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. विजेत्या संघाची कराड येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कन्या महाविद्यालयाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. विकास समितीचे सदस्य प्रमोद खुडे, कोल्हापूर झोनलचे अध्यक्ष प्राचार्य प्रशांत कांबळे, भाऊसाहेब वडार यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्या त्रिशला कदम होत्या.

साखळी पद्धतीने सामन्यास सुरुवात झाली. सायंकाळी अंतिम सामना विवेकानंद कॉलेज विरुद्ध शिवराज महाविद्यालयात झाला. विवेकानंद कॉलेजने एकतर्फी मात करत एक डाव दहा गुणांनी हा सामना जिंकला. विवेकानंद कॉलेजच्या हर्षदा पाटील व श्रेया, तर गडहिंग्लजच्या वैष्णवी देऊळकर या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळी केली. स्पर्धेत जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूरने तृतीय क्रमांक, तर आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. बक्षीस समारंभ स्मिता बुगड यांच्या हस्ते देण्यात आले. डॉ. सविता भोसले यांनी स्वागत व डॉ. सुभाष जाधव यांनी प्रास्ताविक केले. संगीता पाटील यांनी आभार मानले.




इचलकरंजीत शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर विभागीय मुलींच्या खो-खो स्पर्धेत कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजला स्मिता बुगड यांच्या हस्ते चषक देण्यात आले. यावेळी प्रशांत कांबळे, त्रिशला कदम, आदी उपस्थित होते.

20 OCT 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ कबड्डी स्पर्धा रावज ॲकॅडमीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठांतर्गत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेचे यजमानपद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाला मिळाले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. डिसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, विद्यापीठ आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कबड्डी स्पर्धा दि. २०



व २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रावज कबड्डी ॲकॅडमी गोकुळ शिरगाव येथे घेण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन उच्च शिक्षण कोल्हापूर विभागीय संचालक हेमंत कटरे यांच्या हस्ते करण्यात येणार

**■ स्पर्धेचे यजमानपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाला**

आहे. अध्यक्षस्थान जय प्रकाश एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. सतीश माने भूषविणार आहेत. सोसायटीच्या संचालिका प्रा. प्रमिला माने, प्रा. संभाजी पाटील, सल्लागार शशिकांत कसबेकर, डॉ. विशाल चव्हाण-पाटील, डॉ. संतोष बिरनाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. डिसले यांनी दिली. पत्रकार परिषदेसाठी प्रा. सतीश माने, प्रा. प्रमिला माने, शशिकांत कसबेकर, किरण पोवार, डॉ. विशाल पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी

# महात्मा गांधींच्या विचारावर कार्यशाळा

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, गांधी अध्यासन केंद्र कोल्हापूर, डॉ. घाळी महाविद्यालय व समाजवादी प्रबोधिनीमार्फत महात्मा गांधींचा वैचारिक वारसा आणि भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे या विषयावर गुरुवार (दि. २०) सकाळी ९ वा. एकदिवसीय कार्यशाळा होणार आहे. यावेळी भारती पाटील, प्राचार्य डॉ. आनंद मेणसे, प्रसाद कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य मंगलकुमार पाटील यांनी केले आहे.

सकाळ

# रियाध गबुरी यांना पीएचडी



रियाध गबुरी

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील संशोधक विद्यार्थी रियाध राद अबुद अल गबुरी यांनी पीएचडी संपादन केली.

रियाध हे मूळचे इराकचे नागरिक असून त्यांचे पदव्युत्तर शिक्षण पुणे येथे झाले आहे. 'अ कंपॅरिटिव्ह स्टडी ऑफ बँकिंग सेक्टर इन इंडिया अँड इराक विथ रेफरन्स टू देयर रेग्युलेशन फायनांशिअल परफॉर्मन्स अँड डेव्हलपमेंट' या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला. त्यांना वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील डॉ. के. व्ही. मारुलकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभाग प्रमुख प्रा.डॉ. ए. एम. गुरव व अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ

# उपकुलसचिव कुबल यांना पीएच.डी.



संजय कुबल

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव संजय मोहन कुबल यांना आज मानव्यशास्त्र विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. पदवी जाहीर झाली. कुबल यांनी राज्यशास्त्र विषयामध्ये 'महाराष्ट्रातील राजकीय विचारांतील शेतीप्रश्नाचे चर्चाविश्व' या विषयावर शिवाजी विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. यामध्ये महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी वि. रा. शिंदे आणि शरद जोशी यांचा शेती व शेतकरी, शेतकरी संगठन, शेतकऱ्यांप्रती सरकार व शासन यांची कर्तव्ये आदी बाबींविषयी आर्थिक, सामाजिक व राजकीय विचार तसेच संकल्पना यांचा तौलनिक अभ्यास केला आहे. डॉ. प्रकाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले. कुबल हे गेली वीस वर्षे विद्यापीठात कार्यरत आहेत. त्यांनी मुंबई विद्यापीठात उपकुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वित्त व लेखाधिकारी म्हणूनही काम पाहिले आहे.

तरुण भारत

# पदवीधरसाठी तीन उमेदवारी अर्ज दाखल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाचे मतदान १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. पदवीधरसाठी तीन अर्ज दाखल झाले आहेत. अभिषेक मिठारी यांनी ओपन आणि पदवीधरमधून अपक्ष अर्ज भरला आहे. तर संजय मागाडे यांनी अनुसुचित जाती प्रवर्गातून अपक्ष अर्ज भरला आहे.

१५ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून २८ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज भरण्यास मुदत आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहेत. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळीं ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल. विद्यापीठ विकास आघाडीच्या वतीने मुलाखतीला प्रारंभ झाला. बुधवारी सिनेट शिक्षक आणि ॲकॅडमिक कौन्सिलसाठी २० उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. २० रोजी इंजिनिअरिंग विभागाच्या मुलाखती होणार आहेत. शुक्रवार २१ ऑक्टोबर रोजी कॉलेज विभागप्रमुख व प्राचार्यांच्या मुलाखती होणार आहेत.